**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.**

क्र.संगाबाअवि/३/प-चौ/ 942 / २०१७.
दि.०६.०९.२०१७.

प्रति,
प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषयः- परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या तारखांबाबत (हिवाळी -२०१७ परीक्षा)**

संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, हिवाळी -२०१७ परीक्षेकरीता प्रवेशित होऊ इच्छिणा-या व परीक्षेस पात्र असणा-या नियमित महाविद्यालयीन सर्व सत्र पध्दती , अभियांत्रिकी व तांत्रिकी सत्र पध्दती अभ्यासक्रमांच्या सर्व स्नातक परीक्षेच्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे तसेच वार्षिक पध्दती अभ्यासक्रमाच्या माजी व बहिःशाल विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता त्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या तारखेमध्ये वाढ करण्यात आली असून सदर सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे महाविद्यालयाने दिनांक १५/०९/२०१७ पर्यंत **आवश्यक शुल्क , विहीत केलेल्या प्रति दिवस रु.५०/-प्रमाणे विलंब शुल्कासह विद्यापीठात सादर करावयाची आहेत.** सर्व विद्यार्थ्यांकरीता ही अंतीम संधी असल्यामुळे आपणास विनंती करण्यात येते की ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे व्यक्तीगत अडचणीमुळे व इतर कारणामुळे विद्यापीठात सादर करावयाची राहून गेली असतील अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या सुवर्ण संधीचा फायदा होण्याच्या दृष्टिने कृपया आपल्या स्तरावर प्रयत्न करावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ